Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# संत सोयराबाई यांचे मध्ययुगीन स्थान व कामगिरी

**डॉ. प्रताप गायकवाड**, मराठी विभागप्रमुख, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, कर्वे रोड, पुणे

**प्रस्तावना**

मध्ययुगीन काळातील एक महत्त्वाची कवयित्रि म्हणून आपल्याला संत सोयाराबाई यांच्या अभंगांकडे पहावे लागते. बाराव्या शतकातील सोयाराबाईची कविता म्हणजे एका संस्कारक्षम, संवेदनाक्षम, भक्तीप्रवण मनाचे मूक आक्रंदन आहे. इतर संत कवियीत्रीपेक्षा सोयराबाईचे विटाळ विषयक अभंग वेगळे आहेत. सोयराबाईला विठ्ठल कल्पनेतून पहावा लागला होता. आपल्या वेदना दु:ख त्या काळाच्या समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करत आहे. एकूणच मध्ययुगीन काळ आणि परिस्थिती याचा विचार केला असता सोयरबाइची कामगिरी इतर संत कवयित्रीपेक्षा उठून दिसते. माझ्या शोधानिबंधाची मांडणी मी पुढील मुद्यांच्या आधारे करणार आहे.

१. मध्ययुगीन सामाजिक परिस्थिती:
२. सोयराबाई यांचे अभंगातील समाजचित्रण:
३. सोयराबाई यांच्या अभंगातील विद्रोह
४. सोयराबाई यांच्या अभंगातील विटाळविषयक जाणीव

**१. मध्ययुगीन सामाजिक परिस्थिती**

मध्ययुगीन काळातील सामाजिक परिस्थितीचा वेध त्यांच्या अभंगातून घेतला आहे. धर्म, जात व्यवस्था ह्या जाणीवा त्या मांडताना दिसतात. विठ्ठल मंदिराबाहेरूनच विठ्ठलाचे दर्शन ते आपल्या कल्पनेतून करताना दिसतात. त्यावरती ते अभंग रचना करतात त्यातील जळजळीत उद्गार काळीज पिळवटून टाकणारे आहे. हे वाचत असताना आपण कमालीचे अस्वस्थ होतो. याविषयी यु. म. पठाण 'महाराष्ट्राची संत परंपरा' या ग्रंथात सोयाराबाईविषयी म्हणतात' "तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता जातीयतेचे अश्पृश्यातेचे चटके किती प्रखर होते याची जाणीव या अभंगातून होते."१ विठ्ठलाचे श्रीमुख पाहता येत नाही म्हणून ती त्याला म्हणते तुमचे किमान चरण तरी मला दाखवा या अभंगवाणी सोयराबाईच्या विटाळ विषयक जाणीवेची प्रकर्षाने जाणीव होते.

**२. मध्ययुगीन समाज**

यादव काळात दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे प्रतीक म्हणून या अभंगवाणीकडे पाहता येईल या संदर्भात अविनाश सांगोलेकर म्हणतात, "थोडक्यात, त्यांच्या काव्यानिर्मीतीची प्रेरणा केवळ अध्यात्मिक आहे असे नाही, तर सामाजिकही आहे, हे लक्षात येते."२ सोयराबाईच्या काव्यानिर्मीतीची प्रेरणा अध्यात्मिक आहे की सामाजिक आहे, याचे कारण सोयराबाईच्या अभंगातून सामाजिक प्रश्नाचा भडीमार असतो प्रश्न विचारण्याची प्रथा वारकरी पंथात नरहरी सोनार, सावता माळी, कान्होपात्रा, परिसा भागवत, विसोबा खेचर, सेना न्हावी इत्यादी संतानी तत्कालीन समाजाला समोर ठेऊन प्रश्न विचारले आहेत. या संदर्भात अ. ना. देशपांडे म्हणतात, "सामान्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक आर्थिक राजकीय वा धार्मिक प्रतिष्ठा नसलेल्यांना एक दार मात्र उघडे होते. भक्तीचे हे दार सगळयाना शूद्रांना अतिशूद्रांना, पतितांना स्त्रियांना भ्रष्टांना नेहेमी मोकळे आहे, असे संतांनी सांगितले, हे भक्तीचे दार उघडून संतांनी सामान्यातल्या सामान्यांची


Copyright © | JET Network, All Rights Reserved

उपेक्षितातल्या उपेक्षिताची पतीतातल्या पतिताची सगळ्याच अगतीकांची सामाजिक आणि मानसिक गरज भागविण्याचे केवढे थोर आणि उदात्त कार्य केले आहे."३ संतानी हे दार उघडून सर्वांना सामानपातळीवर आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते. तसेच त्या काळातील तीव्र जातीयतेचेही दर्शन या विवेचनातून घडते. सामान्यातल्या गोर-गरीब जनतेची सामाजिक गरज भागवून त्याना मानसिक आधार या संतानी निर्माण केला. आपण सर्व समान पातळीवर विठ्ठलाचे भक्त आहोत याचा विश्वास सामान्य जनतेत पेरण्याचे कार्य संतानी केले. शंकरराव खरात 'चोखोबाचा विद्रोह' या ग्रंथात म्हणतात, "चोखोबाचा विद्रोह हा त्यांच्या अंत:करणात सलणारी सामाजिक जीवनातील शल्य त्यांच्या वाङ्मयात अधून-मधून डोकावल्याशिवाय राहत नाही. ते सामाजिक विषमतेचा निषेध करतात बंडखोरीची भाषाही बोलातात. परंतू पुन्हा रूढ विचारसरणीपुढे मान झुकावतात."४ अभंग ही कवितामनाची वृत्ती आहे. संतांची अभिव्यक्ती आहे. तशीच समाजमनाचीही ती अभिव्यक्ती आहे. म्हणूनच अभंगवाणी लोकप्रिय झाली आहे.

संतांची प्रकृती अभंगातून स्पष्ट होताना दिसते. त्या त्या संतांचे व्यक्तीमत्व बोलके होताना दिसते. सोयाराबाईच्या अभंगात असे व्यक्तीमत्त्व पदोपदी डोकावताना दिसते. यातीहीनातेची जाणीव व्यक्त करत असताना त्या अवस्थेत देवाशी कलह करते. व ती भावना ओसरल्यानंतर मनात पेटलेली आग संचितवाद्यांच्या शिडकाव्याने विझवण्याचा प्रयत्न करते. व मागील जन्म कर्माचे ते फळ भोगलेच पाहिजे. त्याशिवाय सुटका नाही अशा विचारांचे कोश त्यांच्या मनोभोवती पक्क्या बांधलेले आहेत. सोयराबाई अनेक ठिकाणी शरणागती पत्करताना दिसतात. त्याचप्रमाणे अनेक संत तळागाळातून आल्यामुळे विषमाताधिष्ठीत समाज व्यवस्थेतून जीवन कंठीत असताना वेदनेचे असंख्य चटके सोसले आहेत. विशिष्ट अध्यात्मिक स्वातंत्र्याची जाणीव घेऊन ते संघटीतपणे एका झेंड्याखाली आलेले आहेत. त्याना झालेली जाणीव घेऊन समस्त बहुजन समाजात प्रसृत करण्यासाठी ते कटीबद्ध झाले होते.

**३. सोयराबाई यांच्या अभंगातील विद्रोह**

उच्चवर्णीयांनी लादलेली मानसिक गुलामगिरी उखडून फेकण्यासाठी संत संघटितपणे प्रयत्नशील झाले होते. सामाजिक विषमतेमुळे सोयाराबाईची आणि तिच्या परिवाराची कोंडी झाली आहे. गावगाड्यातल्या कारू-नारूला तिच्या परिवाराविषयी कळवला नाही. उपेक्षितांचे हे ओझे तिला असह्य झाले आहे."५ सामाजिक विषमता ही त्या काळातील जीवन जगण्यासाठीची मोठी आडकाठी होती. सोयराबाई आपल्या एका अभंगात म्हणते,

"आमची तो दशा विपरीत झाली I
कोण आम्हा घाली पोटामध्ये II
आमचे पालन करील बा कोण I
तुजवीण जाण दुजे आता II
कळेल ते करा तुमचे उचित I
माझी तो नित्त निवेदिली II
सोयरा म्हणे माझा जीवप्राण तुम्ही I
आणिक तो आम्ही कुठे जावे II"६

आमची अवस्था अशी का केली? तिच्या वाटेला आलेलेल जिणे यामध्ये जीवघेणी व्यथा आहे. आता आमचे पालन कोण करील? तूच सर्वांचा पालनहार आहेस. समाज यातीहीन असल्याकारणाने जवळ घेत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

नाही. 'दूर हो' म्हणतात. देवा तू आमचा जीव की प्राण आहेस तुम्हाला जे चांगले वाटते किंवा उचित वाटते ते करा. तुमच्या बळावर तर ही भक्ती आहे. तुमच्याशिवाय दुसरा तारणहार नाही.

**४. सोयराबाई यांच्या अभंगातील विटाळविषयक जाणीव**

चोखोबा व त्याच्या कुटुंबातील भक्ति पंथातले पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, मेव्हणा बंका हे हीन जातीचे म्हणून दैनंदिन जीवनात भरडले गेले होते. सारांश, सोयाराबाईच्या अभंगात इतका विद्रोह नसला तरी पण प्रश्न विचारण्याची क्षमता आहे. बाराव्या शतकात एक स्त्री संताच्या चळवळीत येऊन अभंगरचना करते व ती अभंगरचना आजपर्यंत टिकून आहे. यामध्ये मराठी भाषकांचा आणि मराठी माणसांचा मोठेपणा सामावला आहे. विटाळ विषयक किंबहुना अश्पृश्यतेची जाणीव सोयराबाईच्या अभंगात दिसून येते.

"हीन दिन म्हणोनी का गा मोकालीले I
परी म्या धरिले पदरी तुमच्या II
आता मोकालीता नव्हे नित बरी I
थोर साजे थोरी थोरपणे II
शरण आलिया दावितासा पाठी I
काय घोर गोष्टी बानू देवा II
सोयरा म्हणे अहो पंढरी निवासा I
तुमचा तो ठसा त्रिभुवनी II"७

आपल्या अभंगात सोयराबाई म्हणते, 'देवाने आपल्याकडे दुर्लक्ष केले तर शरणागताचा अव्हेर केल्याचे बोल देवाला लागणार आहेत. पुराणातील सर्व कथातून देवाने अभय दिल्याचे दिसते. मग मला हा पांडूरंग का जवळ करात नाही? पण आता तुम्हाला सोडणार नाही ही जाब विचारने संघर्ष करणे या अवस्थेला येऊन पोहचली आहे. थोरपणाला साजेल असे कृत्य करा मी तुम्हाला शरण आली आहे, तेव्हा काय करायचे आहे ते ठरवा. तुमचा दबदबा तीनही लोकात आहे, तुम्ही सर्वांचा उद्धार करता पण केवळ मी अस्पृश्य आहे म्हणून तुम्ही माझा उद्धार करीत नाही का?

सोयराबाई आणि चोखोमेळा महान बनविण्यासाठी विठ्ठल चोखोबाच्या घरी गेले म्हणजे मंदिरात जाऊन दर्शन घेण्याचा प्रश्नच नाही. "खरोखर स्पृश्य समाजाशी दोन हात केल्याशिवाय गत्यंतर नाही. विटाळ विटाळ विटाळ सर्वच विटाळ काय आमची ही अवहेलना! बाबा खरोखर सांगतो आता बंड उभारल्याशिवाय तरणोपाय नाही."८ खरोखरच चोखोबाच्या घरात देव आले, त्यानी जेवण केले हे जर पंढरपुरातील ब्राह्मण पाहिले असतील तर पुढे कार्ममेळ्याने अशी भावना आपल्या अभंगातून व्यक्त केली नसती. सोयराबाई आणि चोखोबा यांच्या बाबतीत समाजात राजकारण होताना दिसते. चोखोबावर अन्याय होत असताना सोयराबाई त्याचा जाब विचारात होती. समाजाला नव्हे तर देवाला जाब विचारात होती. 'हीन याती माझी देवा कैसे घडे तुमची सेवा', 'जोहार मायबाप जोहार तुमच्या महारांचा मी महार' असे रूपकात्मक अभंग त्यानी लिहिले आहेत.

सोयराबाई चोखोबाच्या पुढे जाताना दिसतात. देवाला प्रश्न विचारते, विद्रोह करते, दलित साहित्यातील हा पहिला विद्रोह आहे असे म्हणावेसे वाटते. म्हणू सोयराबाईच्या अभंगाना सामाजिक आणि


Copyright © | JET Network, All Rights Reserved

सांस्कृतिक महत्त्व आहे. या बहूतेक अभंगातून दलितांवर झालेलेया सामाजिक अन्यायाची बोच व्यक्त झालेली आहे. असे सर्वातीत अभंग यांनी लिहिले असे म्हणावेसे वाटते. "व्युत्पन्नता बहुश्रुतता आणि कोणतीही सांस्कृतिक परंपरा पाठीशी नसताना प्रांजळ भावनेने केलेली काव्यनिर्मिती किती उत्कट होऊ शकते."९ सोयराबाईच्या अभंगातून व्यक्त झालेला विद्रोह जीवन जगण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झाला आहे, त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची सांस्कृतिक जाणीव नाही. किंबहुना वारसा नाही. ज्या समाजाला लिहिण्याचा वाचण्याचा अधिकार नव्हता, अशा समाजाचे दु:ख ती मांडताना दिसते आहे. या संदर्भात भालचंद्र नेमाडे म्हणतात, "बहुसंख्य वारकरी नेते गरीब क्षुद्र वर्गातून आलेले होते आणि त्याचे लक्षावधी अनुयायी तर निरीक्षर म्हणजे लिखित संस्कृतीपासून मिळणाऱ्या अधिकारापासून वंचित झालेले होते."१० ज्या वर्गाला लिखाणाचा वाचण्याचा अधिकार नव्हता असा वर्ग अभंग रचना करतो, त्या अभंग रचना आजतागायत टिकून आहेत, अधिकारापासून वंचित असणाऱ्या माणसाचे अभंग अनंत भटासारखा ब्राह्मण लिहून घेतोय हे बदलत्या काळाचे प्रतीक म्हणावे लागेल. पंढपूर प्रदेशाला विठ्ठलामुळे विशेष महत्त्व आलेले होते. तो गोर-गरीबांचा कष्टकऱ्याचा अधिकारहीन वर्गाचा देव होता. या देवाची अभंग रचना करीत असताना प्रत्येकाने आपले दु:ख व्यक्त केले आहे. त्यामध्ये सोयराबाई अपवाद कशा असतील? त्यांनीही अश्पृश्यतेच्या व्यथा अभंगातून मांडल्या आहेत. म्हणून या प्रदेशाला महत्त्व आहे.

**समारोप**

बाराव्या शतकात एक स्त्री सोयरबाई यांच्या अभंगात तीव्र विद्रोह येत नसला तरी प्रश्न विचारण्याची क्षमता आहे. हे मान्यच करावे लागते. बाराव्या शतकात एक स्त्री संताच्या चळवळीत येऊन अभंगरचना करते. ती रचना आजपर्यंत टिकून राहते. यामध्येच मराठी भाषेचा मोठेपणा सामावालेला आहे. सोयराबाईच्या अभंगाचे वैशिष्ट्य पाहात असताना आंतरिक संघर्ष, प्रामाणिकपणा, प्रांजळपणा, आत्मनिवेदन आणि उत्कटता हे दिसून येतात. यामुळे त्यांचे स्थान मराठी कवितेत उठून दिसणारे आहे.

**संदर्भग्रंथ**

१. महाराष्ट्राची संत परंपरा, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २०१२, पृ. ५७
२. दलित साहित्य उगम आणि विकास, सांगोलेकर अविनाश, प्रतिमा प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती, २०१०, पृ. ३४
३. प्राचीन मराठी वाङ;मयाचा इतिहास, अ. ना. देशपांडे, भाग पहिला उत्तरार्ध पृ. १६७
४. चोखोबाचा विद्रोह, शंकरराव खरात, सुगावा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २००२, पृ. १०
५. अभंग नवनीत, हे. वि. इनामदार ब्लू बर्ड इंडीआ प्रभात रोड पुणे प्रथमावृत्ती २००७ पृ. २१२
६. सोयाराबाईचे अभंग: आस्वाद आणि अन्वयार्थ, प्रताप गायकवाड, यशोदीप पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती विजयादशमी २०१३ पृ. ५१
७. सोयाराबाईचे अभंग: आस्वाद आणि अन्वयार्थ, प्रताप गायकवाड, यशोदीप पब्लिकेशन्स पुणे. प्रथमावृत्ती विजयादशमी २०१३ पृ. ६१
८. अस्मितादर्श शि. गो. देशपांडे मार्च एप्रिल मे १९८५ पृ. १५
९. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. नासिराबादकर, फडके प्रकाशन कोल्हापूर सहावी आवृत्ती १९९७, पृ. ७८
१०. टीकास्वयंवर, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९४, पृ.४२


Copyright © | JET Network, All Rights Reserved